SMART

मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (SMART) प्रकल्प
प्रकल्प समन्वयन व व्यवस्थापन कक्ष
शेती महामंडळ भवन, २७०,भाबुर्डा ,सेनापती बापट मार्ग ,पुणे -१६
संकेतस्थळ : www.smart-mh.org , दूरध्वनी ०२०-२५६५६५७७/२५६५६५७८

जा.क्र. स्मार्ट /पी.सी.एम.यु./प्र.अ.क./संपादण/209 /२०२२-२३ दिनांक - 07 /०२ /२३

प्रती,
प्रमुख प्रकल्प अंमलबजावणी कक्ष-(सर्व)
स्मार्ट प्रकल्प

विषय: स्मार्ट प्रकल्प अंतर्गत समुदाय आधारित संस्थान मार्फत संपादन करण्यात येणाऱ्या यंत्र समुग्रीमध्ये शासकीय मापदंडात नमूद केलेले सर्व घटक निविदा दस्तऐवजात नमूद असणे अनिवार्य असल्याबाबत

संदर्भ- १) स्मार्ट/पी.सी.एम.यु./सीबीओ/संपादण /१२७१ /२०२२ दि.२९ /०८ /२०२२ रोजीच्या मार्गदर्शक सूचना
२) स्मार्ट/पी.सी.एम.यु./प्र.अ.क/संपादण /४७ /२०२२-२३ दि. ११/०१/२३ रोजीच्या मार्गदर्शक सूचना
३) स्मार्ट/पी.सी.एम.यु./प्र.अ.क/संपादण /११० /२०२२-२३ दि. १९ /०१/२३ रोजीच्या मार्गदर्शक सूचना
४) दि. ३०/०१/२०२३ रोजी झालेल्या स्मार्ट सोसायटी नियामक मंडळ बैठकीचे इतिवृत्त

१) उपरोक्त विषयान्वये सविनय सादर करण्यात येते कि, मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट ) प्रकल्पांतर्गत समुदाय आधारित संस्थेच्या (CBO) मुल्यसाखळी विकासाचे उपप्रकल्प मंजुरी नंतर सदर उपप्रकल्प राबविताना विविध वस्तू, बांधकामे, सल्लागार सेवा, यांचे संपादन समुदाय आधारित संस्थाना संदर्भ क्र. १ च्या मार्गदर्शक सूचनांनुसार करणे बंधनकारक आहे.

२) संदर्भ-२ व ३ नुसार समुदाय आधारित संस्था स्तरावरील संपादन प्रक्रिया गतिमान होण्यासाठी संपादन प्रक्रियेच्या पूर्व मान्यतेचे अधिकार जिल्हा,विभाग व प्रकल्प अमलबजावणी कक्ष यांना वाढवण्यात आले आहेत.

३) संदर्भ क्र. ४ नुसार समुदाय आधारित संस्थाना मंजूर घटकतील यंत्र समुग्रीचे संपादन करण्यासाठी यंत्र समुग्रीचे स्पेसिफिकेशन हे त्यांचा स्तरावर यांत्रिकी अभियंता किंवा समतुल्य अभियंता मार्फत निर्धारित करण्याबाबत मंजूरी प्राप्त झाली आहे. त्यानुसार समुदाय आधारित संस्था स्तरावर निविदा दस्तएवज तयार करताना यंत्र समुग्रीचे स्पेसिफिकेशन समुदाय आधारित संस्थेने त्यांच्या स्तरावर निश्चित करावे व त्यामध्ये शासकीय मापदंडातील नमूद केलेले सर्व घटक असणे आवश्यक आहे.

उदा. Mini Oil Mill चे संपादन प्रक्रिया करताना निविद मध्ये खालील शासकीय मापदंडात नमूद असलेले घटक असणे आवश्यक आहे.

1) Single chamber oil expeller with reduction gear box
2) Filter press
3) Steam round kettle for cooking seeds
4) Boiler
5) Oil tank
6) Weighing balance
7) Including all electric motors
8) Including all machine accessories
9) Including iron and steel platform

४) सर्व प्रकल्प अमलबजावणी कक्षाना कळविण्यात येते की समुदाय आधारित संस्था स्तरावर मंजूर घटकतील यंत्र समुग्रीचे संपादन करताना यंत्र समुग्रीचे स्पेसिफिकेशन हे त्यांच्या स्तरावर यांत्रिकी अभियंता किंवा समतुल्य अभियंता मार्फत निश्चित करण्यात यावे तथापि असे करत असताना यंत्र समुग्रीच्या कोणत्याही एका ब्रँडचे /मॉडेलचे नाव लिहू नये व तसे लिहणे गरजेचे असल्यासच त्यापुढे समतुल्य असा शब्द लिहण्यात यावा तसेच निविदा दस्तऐवजामध्ये शासकीय मापदंडातील नमूद केलेले सर्व घटक नमूद असणे आवश्यक आहे.

५) तरी वरील प्रमाणे सर्व सूचना आपल्या स्तरावर संबंधित समुदाय आधारित संस्थाना देण्यात याव्यात व त्यानुसार निविदा दस्त ऐवजास पूर्व मान्यता देण्यात यावी.

ज्ञानेश्वर बोटे

अतिरिक्त प्रकल्प संचालक ,स्मार्ट